# उपयोजित मराठी



Scanned with OKEN Scanner

3

## (१) प्रमाण मराठी लेखनाचे अनुस्वारविषयक नियम

आपले बोलणे व लिहिणे निर्दोष असावे. प्रमाणभाषेत असावे. याकरिता मराठी भाषेत लेखनविषयक नियम ठरविण्यात आलेले आहेत. त्या नियमांना अनुसरून व्यक्त होणे, लेखन साकारणे प्रमाण लेखनात अंतर्भूत आहेत. लेखनविषयक नियमांमध्ये कालपरत्वे बदल होत असतात. बदल हा कोणत्याही भाषेचा मूलभूत गुणधर्म आहे. भाषांतर्गत बदलाप्रमाणे तिच्या लेखन रूपात बदल होणे स्वाभाविक आहे. मराठी लेखनाच्या नियमात एकसूत्रता यावी म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने इ.स. १९६२ मध्ये पुरस्कृत केलेल्या मराठी लेखनविषयक चौदा नियमांना महाराष्ट्र शासनाने इ.स. १९६२ मध्ये मान्यता दिली. पुढील काळात इ.स. १९७२ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने आणखी चार नियमांची भर घातली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ हे महाराष्ट्रातील साहित्य संस्थांचे प्रातिनिधिक मंडळ असल्याने त्या नियमावलीला महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेली असून राज्य कारभारात व शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात या नियमावलीचे उपयोजन करण्याचे ठरले. या नियमांची विभागणी तीन गटांत केलेली आहे. १) अनुस्वार, २) ऱ्हस्व-दीर्घ, ३) किरकोळ.

आपणांस येथे अनुस्वारविषयक लेखन नियमांचा मागोवा घेणे अपेक्षित आहे.

**नियम १**

१.१ स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.
उदा. गुलकंद, चिंच, तंटा, निबंध, आंबा इ.

१.२ तत्सम शब्दांतील अनुनासिकाबद्दल विकल्पाने पर-सवर्ण लिहिण्यास हरकत नाही. परंतु अशा वेळी अनुस्वारानंतर येणाऱ्या व्यंजनांच्या वर्गातील अनुनासिकच पर-सवर्ण म्हणून योजावे.
उदा. पंकज = पङ्कज, पंचानन = पञ्चानन, पंडित = पण्डित, अंतर्गत = अन्तर्गत, अंबुज = अम्बुज,

१.३ पर-सवर्ण लेखन फक्त तत्सम शब्दांपुरते मर्यादित आहेत. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊन लेखन करावेत.
उदा. दंगा, झांज, बंड, खंत, संप हे शब्द.
दङ्गा, झाञ्ज, बण्ड, खन्त, सम्प असे लिहू नयेत.



Scanned with OKEN Scanner

१.४ अर्थभेद स्पष्ट करण्यासाठी कधीकधी पर-सवर्ण जोडून शब्द लेखन करणे योग्य ठरते.

उदा. वेदांत = वेदामध्ये, वेदान्त = तत्त्वज्ञान,

देहांत = देहामध्ये, देहान्त = मृत्यू.

१.५ काही शब्दांमधील अनुस्वाराचे उच्चार अस्पष्ट असतात. कधीकधी तो उच्चारण्यात येत नाही. अशा शब्दांवर अनुस्वार देऊ नयेत.

उदा. हंसणे, धांवणे, जेंव्हा, तेंव्हा, कोंठे, कांही, हे शब्द हसणे, धावणे, जेव्हा, तेव्हा, कोठे, काही असे लेखन करावे.

**नियम २**

२.१ य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् या वर्णांच्या पूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा. 'ज्ञ्' पूर्वीचा नासोच्चारही केवळ शीर्षबिंदूने दाखवावा.

उदा. संयम, संरचना, संलग्न, संवाद, दंश, मांस, सिंह, संज्ञा इत्यादी शब्द संय्यम, संव्रचना, संल्लग्न, संव्वाद, दंव्श, मांव्स, सिंव्ह, संव्ज्ञा असे लिहू नयेत. उच्चारानुसार अक्षरांचे द्वित्व अथवा द्वित्त होते ते टाळावे.

२.२ तत्सम शब्दांचे लेखन करताना उच्चारानुसारी शीर्षबिंदू द्यावेत.

**नियम ३**

३.१ नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपावर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यये जोडताना अनुस्वार द्यावा.

उदा. मुलांना, तुम्हांस, त्यांसाठी, देशांसाठी, घरांपुढे, लोकांनी, लोकांसमोर इत्यादी.

३.२ आदरार्थी बहुवचनांच्या वेळीही शब्दांच्या सामान्यरूपांवर अनुस्वार द्यावा.

उदा. राज्यपालांचे, मुख्यमंत्र्यांचे, नेहरुंनी, आजोबांचा, तुम्हांस, अध्यक्षांना, शिक्षकांचे, माणसांनी, खांडेकरांच्या इत्यादी.

३.३ शब्दांची पुनरावृत्ती होत असताना तयार होणाऱ्या अभ्यस्त शब्दांच्या सामान्यरूपांवर अनुस्वार लिहावा.

उदा. मुलाबाळांना, खेड्यापाड्यांत, शहराशहरांत, थोरामोठ्यांकडे इत्यादी.

**नियम ४**

४.१ वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणाने व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार लिहू नयेत. प्रमाण मराठी लेखन नियम



Scanned with OKEN Scanner

निश्चितीपूर्वी मराठी भाषेत अनेक शब्दांवर अनुस्वार लेखनाची पद्धत रूढ होती.

उदा. कांही, नांही, तसेंच, जेंव्हा, तेंव्हा, करणें, भरणें, हसूं, केंस, करितां, प्रमाणें, मागें, पुढें, पांच, घरें, करणें, काळीं, नांव, कांच, कां, जों, घरीं, एकदां, पहांट, लांकूड, फुलें, फळें, केळें, वासरें इत्यादी व यासारख्या शब्दांमध्ये अनुच्चारित अनुस्वार लेखन करू नये. हे शब्द काही, नाही, तसेच, जेव्हा, तेव्हा, करणे, भरणे, हसू, केस, करिता, प्रमाणे, मागे, पुढे, पाच, घरे, करणे, काळी, नाव, काच, का, जो, घरी, एकदा, पहाट, लाकूड, फुले, फळे, केळे, वासरे इत्यादी व यासारख्या शब्दांचे विनाअनुस्वाराने लेखन करावे.

४.२ व्युत्पत्तीने सिद्ध होणाऱ्या शब्दांमध्ये अनुच्चारित अनुस्वार लेखन करण्यात येत असे.

उदा. कांटा, चोंच इत्यादी. ते काटा, चोच असेच लिहावेत.

४.३ नादानुकारी शब्दांमध्ये स्पष्ट व खणखणीत अनुनासिक नसेल, तरी उच्चार नासिकाविवरातून किंचित होत असेल तर त्या अक्षरावर अनुस्वार लिहावा.

उदा. वारा सूं सूं करीत सुटला
मोटारींचा भोंगा भों भों वाजत होता.
बकरीचा बें बें आवाज ऐकू आला.
ते मूल रात्रभर ट्याहां ट्याहां करीत होते. इत्यादी.

♦ ♦ ♦



Scanned with OKEN Scanner

## (२) शब्दांच्या जाती (संक्षिप्त परिचय)

आपण बोलत असलेल्या भाषेत अनेक वर्णाक्षरे असतात. वर्ण म्हणजे भाषेतील मूलध्वनी. असे ध्वनी विशिष्ट चिन्हे किंवा संकेत ठरवून कागदावर लिहितात. त्या लिखित चिन्हांना अक्षरे म्हणतात. वर्णाक्षरांचेच शब्द बनतात. 'ज्याच्यापासून काही अर्थबोध होतो अशा वर्णाक्षरास किंवा अक्षर समूहास 'शब्द' म्हणतात. शब्द जेव्हा वाक्यात वापरले जातात, तेव्हा त्यांना व्याकरणात 'पद' म्हणतात. 'पद' म्हणजे स्थान किंवा जागा. (तसेच पद या शब्दाचे पाऊल, गीत असेही अर्थ होतात. पण ते इथे उपयुक्त नाहीत.) कधीकधी पद हे क्रम दाखविते किंवा वाक्यातील विशिष्ट शब्दांचा वाक्यातील इतर शब्दांशी असलेला संबंध सूचित करणारे त्या शब्दाचे त्या वाक्यातील स्थान असाही आशय त्यातून सुचित होतो. शब्दकोशात दिलेले असतात ते शब्द; तेच वाक्यात योजले जातात, तेव्हा ते 'पद' बनतात. शब्दसमूह असेल तर सामासिक शब्द आणि शब्दांच्या इतर प्रवृत्ती सूचित होतात. वाक्य हे शब्दांचे बनलेले असतात. या शब्दांची आठ कार्ये आहेत. म्हणजेच शब्दांच्या आठ जाती आहेत.

(१) नाम, (२) सर्वनाम, (३) विशेषण, (४) क्रियापद, (५) क्रियाविशेषण अव्यये, (६) शब्दयोगी अव्यये, (७) उभयान्वयी अव्यये, (८) केवलप्रयोगी अव्यये.

शब्दांच्या आठ जातींची विभागणी दोन गटात करता येते.

(१) विकारी शब्द (सव्यय), (२) अविकारी शब्द (अव्यय)

**विकारी शब्द (सव्यय)** – ज्या शब्दांच्या रूपांमध्ये लिंग, वचन, पुरुष व विभक्ती यानुसार बदल होतो, त्यांना 'विकारी शब्द (सव्यय)' असे म्हणतात.

| शब्दांची जात | पुल्लिंग | स्त्रीलिंग | अनेकवचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| नाम | मुलगा | मुलगी | मुलगे | मुलांना |
| सर्वनाम | तो | ती | ते | त्यांना |
| विशेषण | चांगला | चांगली | चांगले | चांगल्यांना |
| क्रियापद | गातो | गाते | गातात | गाण्याने |

**अविकारी शब्द (अव्यय)** – ज्या शब्दांच्या रूपांमध्ये लिंग, वचन, पुरुष, विभक्ती याप्रमाणे बदल होत नाही, अशा शब्दांना 'अविकारी शब्द (अव्यय)' असे म्हणतात.

उदा.

क्रियाविशेषण अव्यये : आता, येथे, इकडे



Scanned with OKEN Scanner

शब्दयोगी अव्यये : मागे, पुढे, करिता
उभयान्वयी अव्यये : आणि, म्हणून, अथवा
केवलप्रयोगी अव्यये : अबब, अरेरे, शाबास

आपण शब्दांच्या आठ जातींचा क्रमशः अभ्यास करू.

## १. नाम

आपण आपल्या सभोवताली विविध घटक पाहतो. त्यापैकी काही सजीव, तर काही निर्जीव असतात. काही डोळ्यांनी प्रत्यक्ष दिसतात, तर काही कल्पनेने मानल्या जातात. एखाद्या गोष्टीचे गुणविशेष नजरेने प्रत्यक्ष दिसत नाही. परंतु कल्पनेने त्याचे अस्तित्त्व मात्र मानले जाते. दैनंदिन व्यवहारात फक्त प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टीला उद्देशून 'वस्तू' हा शब्द वापरला जातो. तथापि व्याकरणात प्रत्यक्ष दिसणाऱ्या व काल्पनिक अशा सर्व गोष्टींना उद्देशून 'वस्तू' हा शब्द वापरला जातो. अशा प्रत्येक वस्तूला 'नाव' दिलेले असते.

प्रत्यक्ष दिसणाऱ्या किंवा कल्पनेने जाणवलेल्या कोणत्याही वस्तूला किंवा तिच्या गुणधर्माला जे नाव दिले जाते त्यास 'नाम' असे म्हणतात.

उदा. मुलगा, सातारा, देव, सिंह, गंगा इत्यादी.

**नामाचे प्रकार :** नामाचे तीन प्रकार आहेत (i) सामान्य नाम (ii) विशेषनाम (iii) भाववाचकनाम.

i) **सामान्य नाम :** एकाच जातीच्या सर्व वस्तूंना त्यांच्यातील सारखेपणामुळे किंवा समान गुणधर्मामुळे जे नाव दिले जाते, त्यास 'सामान्य नाम' असे म्हणतात. उदा. झाड, शाळा, फळ, वाडा इत्यादी.

ii) **विशेषनाम :** ज्या नामाने जातीचा बोध होत नसून, त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो, त्यास 'विशेषनाम' असे म्हणतात. उदा. भारत, महाराष्ट्र, शौर्यराज, स्वराज, परभणी इत्यादी.

iii) **भाववाचकनाम :** ज्या नामाने वस्तूमधील किंवा प्राण्यामधील गुण, धर्म किंवा भाव यांचा बोध होतो. त्यास भाववाचकनाम किंवा धर्मवाचकनाम असे म्हणतात. उदा. शौर्य, सभ्यता, प्रामाणिकपणा इत्यादी.

## २) सर्वनाम

वाक्यात नामाबद्दल येणारा शब्द. नामाची पुनरावृत्ती टाळावी म्हणून मी, तू, हा, आपण, कोण, काय यासारखे सर्वनाम रूपी शब्द वाक्यात वापरले जातात. सर्वनामांना स्वतःचा अर्थ नसतो. त्यांना त्या त्या नामाचा अर्थ प्राप्त



Scanned with OKEN Scanner

होतो. सर्वनामे नामाचे प्रतिनिधी असतात. नामाचे कार्य करतात, म्हणून त्यास 'प्रतिनाम' असेही म्हणतात.

नामाबद्दल योजिलेल्या त्याच अर्थाच्या विकारी शब्दास 'सर्वनाम किंवा प्रतिनाम' असे म्हणतात. उदा. मी, आम्ही, आपण, तो, ती, ते, आपण, तू, जो, जी, कोण, काय इत्यादी.

**सर्वनामांचे प्रकार :** सर्वनामांचे एकंदर सहा प्रकार आहेत (i) पुरुषवाचक सर्वनाम (ii) दर्शक सर्वनाम (iii) संबंधी सर्वनाम (iv) प्रश्नार्थक सर्वनाम (v) सामान्य किंवा अनिश्चित सर्वनाम (vi) आत्मवाचक सर्वनाम.

**(i) पुरुषवाचक सर्वनाम :** स्वत: ज्यांच्याशी आणि ज्यांच्याविषयी आपण बोलतो किंवा लिहितो त्या व्यक्तींचा वा वस्तूंचा बोध देणाऱ्या शब्दास व्याकरणात 'पुरुष' असे म्हणतात. या तिन्ही वर्गातील नामाऐवजी येणाऱ्या सर्वनामास 'पुरुषवाचक' सर्वनाम असे म्हणतात. उदा. मी, आम्ही, तू, तो, ते, तुम्ही इत्यादी.

**पुरुषवाचक सर्वनामाचे प्रकार :** पुरुषवाचक सर्वनामाचे तीन प्रकार आहेत. अ) प्रथमपुरुषवाचक सर्वनामे ब) द्वितीयपुरुषवाचक सर्वनामे क) तृतीयपुरुषवाचक सर्वनामे.

अ) **प्रथमपुरुषवाचक सर्वनामे :** बोलणारा व्यक्ती स्वत:चा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती प्रथमपुरुषवाचक सर्वनामे आहेत. उदा. मी, आम्ही, आपण, स्वत: इत्यादी.

ब) **द्वितीयपुरुषवाचक सर्वनामे :** ज्यांच्याशी बोलायचे त्या व्यक्ती व वस्तू यांचा उल्लेख करताना आपण जी सर्वनामे वापरतो, ती द्वितीयपुरुषवाचक सर्वनामे आहेत. उदा. तू, तुम्ही, आपण, तुला इत्यादी.

क) **तृतीयपुरुषवाचक सर्वनामे :** ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती व वस्तू यांचा उल्लेख करताना आपण जी सर्वनामे वापरतो, ती तृतीयपुरुषवाचक सर्वनामे आहेत.उदा. ती, ते, त्या इत्यादी.

**(ii) दर्शक सर्वनाम :** ज्या सर्वनामाचा वापर जवळची किंवा दूरची वस्तू दाखविण्यासाठी केला जातो, अशा सर्वनामास 'दर्शक सर्वनाम' असे म्हणतात. उदा. हा, ही, हे, तो, ती, ते इत्यादी.

**(iii) संबंधी सर्वनाम :** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणाऱ्या सर्वनामास 'संबंधी सर्वनाम' असे म्हणतात. उदा. जो नियमितपणे अभ्यास करतो, तो परीक्षेत उत्तीर्ण होतो, जे चकाकते, ते सोने असतेच असे नाही.



Scanned with OKEN Scanner

**(iv) प्रश्नार्थक सर्वनाम :** ज्या सर्वनामाचा उपयोग वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी केला जातो. त्या सर्वनामास 'प्रश्नार्थक सर्वनाम' असे म्हणतात. उदा. कोण, काय, कोणी, कोणास, कोणाला, कोणाकडून, कोणासाठी इत्यादी.

**(v) सामान्य/अनिश्चित सर्वनाम :** जेव्हा कोण, काय ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी वापरली न जाता, ती कोणत्या नामांबद्दल आली आहेत. हे निश्चितपणे सांगता येत नाही, तेव्हा त्यांना 'सामान्य किंवा अनिश्चित सर्वनाम' असे म्हणतात.उदा. कोण, काय, कोणी, कोणास, कोणाला इत्यादी.

**(vi) आत्मवाचक/स्वत:बद्दल सर्वनाम :** आपण या सर्वनामाचा अर्थ जेव्हा स्वत: असा घेतो, तेव्हा त्यास 'आत्मवाचक' अथवा 'स्वत:वाचक' सर्वनाम असे म्हणतात. उदा. मी स्वत: त्याला पाहिले., तो आपण होऊन माझ्याकडे आला.

### ३) विशेषण

नामाबद्दल विशेष अशी माहिती सांगणाऱ्या शब्दाला 'विशेषण' असे म्हणतात. ज्या नामाबद्दल विशेष अशी माहिती सांगितली जाते, त्या नामास 'विशेष्य' असे म्हणतात. उदा. 'पिशव्या' या शब्दाने वस्तूची व्यापकता वाढते. तर 'हिरव्या पिशव्या' या विशेषणाने कमी वस्तूंचा बोध होतो. म्हणजेच विशेषणांच्या अधिकतेमुळे नामाची व्याप्ती मर्यादित होते.

नामाबद्दल विशेष माहिती सांगून त्याची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या विकारी शब्दास 'विशेषण' असे म्हणतात. उदा. सुंदर गोष्ट, शंभर आंबे, काळा कुत्रा इत्यादी.

**विशेषणाचे प्रकार :** विशेषणाचे तीन प्रकार आहेत (i) गुणविशेषण, (ii) संख्याविशेषण, (iii) सार्वनामिक विशेषण.

**(i) गुणविशेषण:** कोणत्याही प्रकारच्या नामाचा गुण किंवा विशेष दाखवणाऱ्या विशेषणाला 'गुणविशेषण' असे म्हणतात. उदा. १. मधुर आवाज २. शूर मुलगा ३. गरीब गाय.

**(ii) संख्याविशेषण :** ज्या विशेषणामुळे नामाची संख्या दाखवली जाते, त्या विशेषणाला 'संख्याविशेषण' असे म्हणतात. उदा. बारा महिने, चौदा भाषा, तिसरा भाग, अर्धा हिस्सा इत्यादी.

**संख्याविशेषणाचे प्रकार :** संख्याविशेषणाचे एकूण पाच प्रकार आहेत – गणनावाचक, क्रमवाचक, आवृत्तिवाचक, पृथकत्ववाचक, अनिश्चित.

- **गणनावाचक :** ज्या विशेषणांचा उपयोग केवळ गणती किंवा गणना करण्यासाठी केला जातो. त्यास 'गणनावाचक संख्याविशेषण' असे म्हणतात. उदा. अर्धा तास, दोघे मुलगे, साठ रुपये इत्यादी.



Scanned with OKEN Scanner

**गणनावाचकाचे प्रकार :** गणनावाचकाचे एकूण तीन प्रकार आहेत.
पूर्णांकवाचक - उदा. एक, दोन, शंभर इत्यादी,
अपूर्णांकवाचक - उदा. पाव, अर्धा, पाऊण इत्यादी,
साकल्यवाचक - उदा. दोघे, उभयता, चाऱ्ही इत्यादी.

- **क्रमवाचक :** जी विशेषणे वस्तूंचा क्रम दाखवितात अशांना 'क्रमवाचक' विशेषणे म्हणतात. उदा. पहिला वर्ग, चौथा बंगला, आठवी इयत्ता इत्यादी.
- **आवृत्तीवाचक :** जी विशेषणे संख्येची आवृत्ती दर्शवितात, त्यास 'आवृत्तिवाचक' संख्याविशेषण म्हणतात. उदा. चौपट मुले, दसपट रुपये, दुहेरी रंग इत्यादी.
- **पृथकत्ववाचक :** जी विशेषणे अलगतेचा बोध करून देतात. अशांना 'पृथकत्ववाचक विशेषण' म्हणतात. उदा. एकेक मुलगा, दहा दहांचा गट इत्यादी.
- **अनिश्चित :** जी संख्याविशेषणे निश्चित अशी संख्या दाखवित नाहीत. अशांना 'अनिश्चित संख्यावाचक विशेषण' म्हणतात. उदा. सर्व रस्ते, थोडी मुले, काही पक्षी इत्यादी.

**(iii) सार्वनामिक विशेषण :** सर्वनामांपासून तयार झालेल्या अशा विशेषणांना 'सार्वनामिक किंवा सर्वनामसाधित विशेषण' असे म्हणतात. उदा. हा कागद, तो मनुष्य, ती शाळा इत्यादी.

## ४) क्रियापद

क्रियापदातील मूळ शब्दाला 'धातू' असे म्हणतात. धातूला प्रत्यय लागून क्रियापदाची विविध रूपे तयार होतात. क्रियापदाने सूचित केलेली क्रिया करणारा जो कोणी असेल, त्यास 'कर्ता' म्हणतात. क्रियापदाने दर्शवलेली क्रिया ही कर्त्यापासून होते व केव्हा केव्हा ती कोणावर किंवा कशावर तरी घडते. ती ज्याच्यावर घडते, ते त्या क्रियापदाचे 'कर्म' आहे. कर्ता, कर्माबरोबर क्रियापद हा घटक महत्त्वपूर्ण आहे. त्याशिवाय वाक्याचा अर्थ पूर्ण होऊ शकत नाही.

वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दास 'क्रियापद' असे म्हणतात. उदा. सदूने काच फोडली, कोल्हा द्राक्षे खातो, मुलगी गाणे गाते इत्यादी.

**क्रियापदांचे प्रकार :** क्रियापदांचे एकंदर तेरा प्रकार पडतात i) सकर्मक, ii) अकर्मक, iii) द्विकर्मक, iv) उभयविध, v) अपूर्ण विधान, vi) संयुक्त क्रियापदे, vii) सहाय्यक/गौण, viii) सिद्ध, ix) साधित, x) प्रयोजक, xi) शक्य, xii) अनियमित/गौण, xiii) भावकर्तृक/अकर्तृक

i) **सकर्मक क्रियापद :** ज्या वाक्यात क्रियापदाच्या जोडीला कर्म



Scanned with OKEN Scanner

योजलेले असते, त्यास 'सकर्मक क्रियापद' असे म्हणतात. उदा. गवळी दूध विकतो.

ii) **अकर्मक क्रियापद :** ज्या वाक्यात क्रियापदाच्या जोडीने कर्म आलेले नसते, त्यास 'अकर्मक क्रियापद' असे म्हणतात. उदा. मुले गेली, मनीष आला इत्यादी.

iii) **द्विकर्मक क्रियापदे :** वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यास ज्या क्रियापदांना दोन कर्म योजलेली असतात, त्यांस 'द्विकर्मक क्रियापदे' असे म्हणतात. उदा. आजीने नातीला गोष्ट सांगितली, तिने भिकाऱ्याला पैसा दिला.

iv) **उभयविध क्रियापदे :** जर एकच क्रियापद दोन वेगवेगळ्या वाक्यात सकर्मक व अकर्मक अशा दोन पद्धतीने वापरलेले असेल, तर त्यास 'उभयविध क्रियापदे' असे म्हणतात. उदा. रामाने धनुष्य मोडले, ते लाकडी धनुष्य मोडले.

v) **अपूर्णविधान क्रियापदे :** जी क्रियापदे अपूर्ण विधानाची असतात. ती पूर्ण होण्यासाठी ज्या शब्दांची गरज असते, त्यास 'अपूर्णविधान क्रियापदे' असे म्हणतात. उदा. राम झाला -- राम राजा झाला, मुलगा आहे -- मुलगा हुशार आहे.

vi) **संयुक्त क्रियापदे :** जे क्रियापद धातुसाधित व साहाय्य क्रियापद यांच्या संयोगाने तयार होते त्या क्रियापदास 'संयुक्त क्रियापद' असे म्हणतात. उदा. क्रीडांगणावर मुले खेळू लागली.

vii) **सहाय्यक क्रियापदे/गौण क्रियापदे :** जेव्हा वाक्यात धातुसाधित व क्रियापद हे दोन्ही मिळून एकच क्रिया व्यक्त होते, अशा धातुसाधिताना मदत करणाऱ्या क्रियापदास 'सहाय्क क्रियापद' असे म्हणतात. उदा. बाळ, एवढा लाडू खाऊन जा.

viii) **सिद्ध क्रियापदे :** मूळ धातूना 'सिद्ध धातू' असे म्हणतात. सिद्ध धातूंना प्रत्यय लावून जे क्रियापद तयार होते, त्यास 'सिद्ध क्रियापदे' असे म्हणतात. उदा. जा, ये, कर, ऊठ, बस इत्यादी.

ix) **साधित क्रियापदे :** विविध जातींच्या शब्दांपासून तयार होणाऱ्या धातूंना 'साधित धातू' म्हणतात. तसेच साधित धातूपासून तयार झालेल्या क्रियापदांना 'साधित क्रियापदे' असे म्हणतात. उदा. हाताळ, पाणाव, स्थिराव, आणव, पुढार इत्यादी.

x) **प्रयोजक क्रियापदे :** कर्ता वाक्यात क्रिया करणारा नसून, तो ती क्रिया दुसऱ्याकडून करवून घेतो. याला 'प्रयोजक' हा शब्द आहे.



Scanned with OKEN Scanner

म्हणून अशा प्रकारच्या धातूंना 'प्रयोजक क्रियापदे' असे म्हणतात. उदा. गुरुजींनी विद्यार्थ्यास बाकावर बसवले.

xi) **शक्य क्रियापदे :** कर्त्याला ती क्रिया करण्याचे सामर्थ्य आहे, असा बोध होतो, अशा क्रियापदास 'शक्य क्रियापदे' असे म्हणतात. उदा. त्याला आता घरी जाववते, मला दहा मैल चालवते.

xii) **अनियमित/गौण क्रियापदे :** मराठीत असे काही धातू आहेत त्यांना काळांचे व अर्थाचे सर्व प्रत्यय न लागता ते थोड्या वेगळ्याच प्रकारे चालतात. त्यांना 'अनियमित अथवा गौण क्रियापदे' म्हणतात. उदा. मुलांनी सतत खेळू नये, आई घरी नाही.

xiii) **भावकर्तृक/अकर्तृक क्रियापदे :** क्रियापदातील क्रियेचा मूळ अर्थ म्हणजे भाव. तोच वाक्याचा कर्ता असतो. यात स्पष्ट कर्ता दिसत नाही. अशा क्रियापदांना 'भावकर्तृक किंवा अकर्तृक क्रियापदे' असे म्हणतात. उदा. मला घरी पोहचण्यापूर्वीच सांजावले, आज दिवसभर सारखे गडगडते.

### ५) क्रियाविशेषण अव्यये

वाक्यात ज्या शब्दांच्या रूपात लिंग, वचन, विभक्ती यांचे प्रत्यय लागत नाहीत. त्यामुळे शब्दांच्या रूपांत कोणताही बदल होत नाही, म्हणून अशा शब्दांना 'अविकारी शब्द' म्हणतात. यात 'क्रियाविशेषण अव्यये' या शब्द प्रकाराचा समावेश होतो.

क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला 'क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात. उदा. मी परवा येईन, सुरेश हळू बोलतो.

**क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार :** क्रियाविशेषण अव्ययांचे मुख्य दोन प्रकार आहेत. (अ) अर्थावरून, (ब) स्वरूपावरून

**(अ) अर्थमूलक क्रियाविशेषण अव्यये प्रकार :** अर्थमूलक क्रियाविशेषण अव्ययांचे एकूण सहा प्रकार पडतात. (i) कालवाचक (ii) स्थलवाचक (iii) रीतिवाचक (iv) संख्यावाचक/परिमाणवाचक (v) प्रश्नार्थक (vi) निषेधार्थक

i) **कालवाचक क्रियाविशेषण अव्यये :** जो शब्द क्रियेचा काळ अथवा क्रियेची वेळ दाखवतो, त्या शब्दास 'कालवाचक' क्रिया विशेषण अव्यये असे म्हणतात. उदा. आज, उद्या, आता, नेहमी, वारंवार, रात्री इत्यादी.

कालवाचक क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार

(अ) कालदर्शक - आता, उद्या, परवा, सध्या, लगेच.

(ब) सातत्यदर्शक - नित्य, सदा, सर्वदा, सतत, नेहमी.



Scanned with OKEN Scanner

(क) आवृत्तिदर्शक - वारंवार, पुन्हा पुन्हा, दररोज.

ii) **स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये :** जो शब्द क्रियेचे स्थळ अथवा ठिकाण दर्शवतो, त्या शब्दास 'स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात. उदा. सर्वत्र, समोरून, तेथे, येथून इत्यादी.

स्थलवाचक क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार :

(अ) स्थितीदर्शक - येथे, तेथे, जेथे, खाली, वर, कोठे

(ब) गतिदर्शक - इकडून, तिकडून, दूर, लांब, तेथून, मागून

iii) **रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये :** जो शब्द क्रियेची रीत दर्शवितो, त्या शब्दास 'रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये' म्हणतात. उदा. जपून, झटकन, सावकाश इत्यादी.

iv) **संख्यावाचक/परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यये :** जो शब्द क्रिया किती वेळा घडली किंवा क्रियेचे परिमाण दाखवतो, त्या शब्दास 'संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात. उदा.अनेकदा, काहीसा, चारदा, अगदी इ.

v) **प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यये :** वाक्यातील शब्द त्या त्या वाक्यांतील विधानांना प्रश्नाचे स्वरूप देतात, त्यास 'प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात. उदा. तुम्ही आमच्याकडे याल का?

vi) **निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यये :** शब्द त्या त्या वाक्यातील क्रियेचा नकार किंवा निषेध दर्शवितात, त्यास निषेधार्थक 'क्रियाविशेषण अव्यये' म्हणतात. उदा. तो न चुकता येतो, तो तोंड उघडेल तर ना!

**(ब) स्वरूपमूलक क्रियाविशेषण अव्यये प्रकार :** स्वरूपमूलक क्रियाविशेषण अव्ययांचे तीन प्रकार पडतात. (i) सिद्ध, (ii) साधित,(iii) स्थानिक.

i) **सिद्ध क्रियाविशेषण अव्यये :** जे शब्द मूलत:च क्रियाविशेषणे आहेत, त्यांना 'सिद्ध क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात. उदा. येथे, तेथे, आज, पुढे, मागे, आता इत्यादी.

ii) **साधित क्रियाविशेषण अव्यये :** जे शब्द मूळ शब्दांना प्रत्यय लागून बनले आहेत, अशांना 'साधित क्रियाविशेषण अव्यये ' असे म्हणतात. उदा. मोठ्याने, वस्तुता, एकदा, हसताना इत्यादी.

iii) **स्थानिक क्रियाविशेषण अव्यये :** वाक्यात जेव्हा इतर जातीचे शब्द येतात, तेव्हा त्यास 'स्थानिक क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात. उदा. ती काय मस्त गाते (नाम), तो इंग्रजी चांगले बोलतो (विशेषण).



Scanned with OKEN Scanner

### ६) शब्दयोगी अव्यये

लिंग-वचनांच्या बदलानुसारही किंवा इतर कोणते प्रत्यय लागूनही त्यांच्या रूपांत परिवर्तन होत नसल्यामुळे शब्दयोगी अव्यये 'अविकारी शब्द' प्रकार ठरतात. वाक्यात शब्द शब्दाला जोडून येतो, त्यातून शब्दयोगी अव्ययांची निर्मिती होते.

एखाद्या वाक्यात एकापेक्षा अधिक शब्दयोगी अव्यये असू शकतात. उदा. 'मुंबईपासून पुण्यापर्यंत जाण्यासाठी सुमारे चार तास लागतात.'

वाक्यात कोणत्यातरी शब्दाला जोडून येणाऱ्या आणि त्या शब्दाचा त्याच वाक्यातील इतर शब्दांशी संबंध जोडणाऱ्या विकारी शब्दाला 'शब्दयोगी अव्यये' असे म्हणतात. उदा. वर, नंतर, विषयी, साठी, कडे इत्यादी.

**अर्थावरून शब्दयोगी अव्ययांचे प्रकार :** अर्थावरून शब्दयोगी अव्ययांचे प्रकार पुढीलप्रमाणे मानले जातात.

| | |
|---|---|
| कालवाचक | : आत, पूर्वी, पुढे, आधी, नंतर. |
| गतिवाचक | : आतून, खालून, मधून, पर्यंत. |
| स्थलवाचक | : आत, बाहेर, मागे, पुढे, मध्ये. |
| करणवाचक | : मुळे, योगे, करून, कडून, द्वारा. |
| हेतुवाचक | : साठी, कारणे, करिता, अर्थी. |
| व्यतिरेकवाचक | : शिवाय, खेरीज, विना, वाचून. |
| तुलनावाचक | : पेक्षा, तर, तम, मध्ये, परीस. |
| योग्यतावाचक | : योग्य, सारखा, जोगा, सम. |
| कैवल्यवाचक | : च, मात्र, ना, पण, फक्त. |
| संग्रहवाचक | : सुद्धा, देखील, ही, पण. |
| संबंधवाचक | : विशी, विषयी, संबंधी. |
| साहचर्यवाचक | : बरोबर, सह, संगे. |
| भागवाचक | : पैकी, पोटी, आतून. |
| विनिमयवाचक | : बद्दल, ऐवजी, जागी. |
| दिक्‌वाचक | : प्रत, प्रति, कडे, लागी. |
| विरोधवाचक | : विरुद्ध, वीण, उलटे. |
| परिणामवाचक | : भर. |

### ७) उभयान्वयी अव्यये

उभय म्हणजे दोन. अन्वय म्हणजे संबंध. म्हणजेच दोन शब्द अथवा दोन किंवा अधिक वाक्ये यांना जोडण्याचे, सांधण्याचे कार्य उभयान्वयी अव्यये करतात. दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांना जोडण्याचे कार्य करणाऱ्या अविकारी



Scanned with OKEN Scanner

शब्दाला 'उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. परंतु, किंवा, आणि, व, अथवा, पण, म्हणून, कारण, की, यासाठी, जरी तरी, जर तर इत्यादी.

**उभयान्वयी अव्ययांचे प्रकार :** उभयान्वयी अव्ययांचे प्रमुख दोन प्रकार पडतात (अ) प्रधानत्वसूचक (ब) गौणत्वसूचक

**(अ) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये :** जी उभयान्वयी अव्यये दोन प्रधान वाक्यांना जोडण्याचे कार्य करतात, त्यांना 'प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. सहा वाजले आणि संदेश उठला, मी त्याला बोलावले, परंतु तो आला नाही.

**(ब) गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये :** जी उभयान्वयी अव्यये एक प्रधान वाक्य व एक गौण वाक्य जोडण्याचे कार्य करतात, त्यांना 'गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. अंगात सदरा घाल; कारण थंडी पडली आहे., जरी तो म्हणाला, तरी मी येणार नाही.

**प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांचे प्रकार :** प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांचे एकूण चार प्रकार पडतात (i) समुच्चयबोधक (ii) विकल्पबोधक (iii) न्यूनत्वबोधक (iv) परिणामबोधक.

i) **समुच्चयबोधक :** दोन प्रधान वाक्य जेव्हा एकत्र जोडली जातात, तेव्हा अशा उभयान्वयी अव्ययांना 'समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये' म्हणतात. उदा. विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.

ii) **विकल्पबोधक :** एकापेक्षा अनेक बाबींपैकी एका बाबीची अपेक्षा जिथे व्यक्त केली जाते, त्यास 'विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये' म्हणतात. उदा. तुला ज्ञान हवे की धन हवे?

iii) **न्यूनत्वबोधक/विरोधदर्शक :** पहिल्या वाक्यात उणिवा किंवा दोन वाक्यात विरोध दर्शविला जातो, अशा अव्ययांना 'न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यये' म्हणतात. उदा. मरावे परी कीर्तीरूपे उरावे.

iv) **परिणामबोधक :** जेव्हा पहिल्या वाक्याची घटना दुसऱ्या वाक्यात परिणाम सूचित करते, तेव्हा त्यास 'परिणामबोधक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. मधूने मनापासून अभ्यास केला; म्हणून त्याला यश आले.

**गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्ययांचे प्रकार :** गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्ययांचे एकूण चार प्रकार पडतात. त्यात (i) स्वरूपबोधक (ii) कारणबोधक (iii) उद्देशबोधक (iv) संकेतबोधक.

i) **स्वरूपबोधक :** प्रधान वाक्याचे स्वरूप गौण वाक्याने सूचित होते,



Scanned with OKEN Scanner

त्यास 'स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. एक रुपया म्हणजे शंभर पैसे.

ii) **कारणबोधक :** पहिल्या प्रधान वाक्याचे कारण दुसरे गौण वाक्य असते. असे कारण दर्शविणाऱ्या अव्ययांना 'कारणबोधक गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. त्याला बढती मिळाली, कारण त्याने चोख कामगिरी बजावली.

iii) **उद्देशबोधक :** गौणवाक्याचा उद्देश प्रधानवाक्यातून व्यक्त होणाऱ्या क्रियेस 'उद्देशबोधक गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. चांगला औषधोपचार लाभावा म्हणून तो मुंबईस गेला.

iv) **संकेतबोधक :** पहिल्या वाक्यातील अटीवर दुसऱ्या वाक्यातील गोष्ट अवलंबून असते. तसेच पहिले वाक्य गौण, तर दुसरे प्रधान असते. असे संकेत वा अटी सूचित करणाऱ्या अव्ययांना 'संकेतबोधक गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्यये' असे म्हणतात. उदा. प्रयत्न केला तर फायदाच होईल, तू माझ्याकडे आलास, की मी येईन.

### ८) केवलप्रयोगी अव्यये

मानव आपल्या मनातील विचार वा भावना शब्दांच्या अथवा वाक्यांच्याद्वारे प्रकट करत असतो. कधी कधी विचार व्यक्त होण्याऐवजी दाटून वा उचंबळून आलेल्या भावनांचा स्फोट मुखावाटे सहजपणे बाहेर पडतो. अशा शब्दांना 'उद्‌गारवाचक शब्द' म्हणतात. या शब्दांनाच व्याकरणात 'केवलप्रयोगी अव्यये' असे म्हणतात. भावना व्यक्त करणाऱ्या कोणत्याही उद्‌गारवाचक शब्दापुढे उद्‌गारचिन्ह (!) द्यावे लागते. व्याकरणाच्या दृष्टीने केवलप्रयोग म्हणजे उपयोग होय. मनातील आनंद, आश्चर्य, दुःख किंवा अन्य भावना व्यक्त करणाऱ्या अविकारी शब्दास 'केवलप्रयोगी अव्यये' असे म्हणतात. उदा. अरेरे! बिचारा कर्जात साफ बुडाला, शाबास! असाच छान खेळत जा, छे! मी तिकडे गेलोच नाही इत्यादी.

प्रकार

१. हर्षदर्शक : वा वा, शाबास, वाहवा, अहाहा
२. शोकदर्शक : अरेरे, आईग, देवा रे
३. आश्चर्यदर्शक : अबब, अरे बापरे, अरेच्या, अग बाई
४. प्रशंसादर्शक : शाबास, ठीक, छान
५. संमतिदर्शक : जी, हां, ठीक, बरं, अच्छा
६. विरोधदर्शक : छे, छट, अहं, उंहू, हॅट, छेछे
७. तिरस्कारदर्शक : छी:, थू:, शी, हड, हत, छट



Scanned with OKEN Scanner

८. संबोधनदर्शक : अगं, अरे, अहो, ए, अगा, बा
९. मौनदर्शक : चूप, चिप, गप, गुपचिप

**संदर्भग्रंथ सूची**

१. वाळंबे मो.रा. – सुगम मराठी व्याकरण लेखन, नितीन प्रकाशन, पुणे.
२. गोविलकर लीला – मराठीचे व्याकरण, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
३. मराठी व्याकरण – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ, पुणे.
४. झांबरे स.ध. – मराठी व्याकरणाचा अभ्यास, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
५. तावरे स्नेहल – उपयोजित मराठी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
६. नसिराबादकर ल.रा. – व्यावहारिक मराठी, फडके प्रकाशन, पुणे.

♦ ♦ ♦

Dayanand College Of Arts, Latur
ACC. No.
Date
LIBRARY